**"वैशिष्ट्यपूर्ण" योजनेअंतर्गत नगरपरिषदांना निधी वितरीत करण्याबाबत.**
सन २०२३-२४ लेखाशिर्ष (४२१७ ०६०३) अंतर्गत
अंबाजोगाई नगरपरिषद, जि.बीड करिता
रक्कम रु.१.२० कोटी
परळी नगरपरिषद जि. बीड करिता
रक्कम रु.१.५० कोटी
वडवणी नगरपंचायत जि. बीड करिता
रक्कम रु.०.५० कोटी
पाटोदा नगरपंचायत जि. बीड करिता
रक्कम रु. ०.५० कोटी
आष्टी नगरपंचायत जि. बीड करिता
रक्कम रु. ०.५० कोटी
बीड नगरपरिषद जि. बीड करिता
रक्कम रु. २.०० कोटी
केज नगरपंचायत जि. बीड करिता
रक्कम रु. ०.५० कोटी
माजलगांव नगरपरिषद जि. बीड करिता
रक्कम रु.१.४० कोटी
शिरुर (का.) नगरपंचायत जि. बीड करिता
रक्कम रु. ०.४० कोटी
धारुर नगरपरिषद जि. बीड करिता
रक्कम रु. ०.२० कोटी
गेवराई नगरपरिषद जि. बीड करिता
रक्कम रु. ०.८० कोटी
(एकुण रक्कम रु. ९.५० कोटी)

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-नपावै-२०२३/प्र.क्र.३२७(२८)/नवि-१६**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- ३१ जुलै, २०२३**

**संदर्भ :-**

(१) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:- धोरण-२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि. १७ नोव्हेंबर, २०१७ व दि. ३० सप्टेंबर, २०२०

(२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. १२ एप्रिल, २०२३

**प्रस्तावना :-**

राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे सुधारीत निकष व मार्गदर्शक तत्वे संदर्भाधीन क्रमांक (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयांच्या अनुषंगाने, **"वैशिष्ट्यपूर्ण"** या योजनेअंतर्गत राज्यातील नगर परिषद / नगर पंचायतींना निधी व कामे मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

**"नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान"** या योजतेअंतर्गत **अंबाजोगाई नगरपरिषद, जि.बीड करिता रक्कम रु.१.२० कोटी (२) परळी नगरपरिषद जि. बीड करिता रक्कम रु.१.५० कोटी (३) वडवणी नगरपंचायत जि. बीड करिता रक्कम रु.०.५० कोटी (४) पाटोदा नगरपंचायत जि. बीड करिता रक्कम रु. ०.५० कोटी (५) आष्टी नगरपंचायत जि. बीड करिता रक्कम रु. ०.५० कोटी (६) बीड नगरपरिषद जि. बीड करिता रक्कम रु. २.०० कोटी (७) केज नगरपंचायत जि. बीड करिता रक्कम रु.०.५० कोटी (८) माजलगांव नगरपरिषद जि. बीड करिता रक्कम रु.१.४० कोटी (९) शिरुर (का.) नगरपंचायत जि. बीड करिता रक्कम रु. ०.४० कोटी (१०) धारुर नगरपरिषद जि. बीड करिता रक्कम रु. ०.२० कोटी (११) गेवराई नगरपरिषद जि. बीड करिता रक्कम रु. ०.८० कोटी असे एकुण रक्कम रु.९,५०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. नऊ कोटी पन्नास लक्ष फक्त)** इतका निधी सोबत जोडलेल्या विवरणपत्रामधील कामांकरीता वितरीत करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना एकत्रित प्रकल्प खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी व संदर्भाधीन क्र. (२) येथील शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करावी.

३. सदर प्रकल्पाअंतर्गतची कार्यान्वयन यंत्रणा संबंधित **"सार्वजनिक बांधकाम विभाग"** राहील.

४. सदर शासन निर्णयानुसार प्रत्येक कामाच्या रक्कम रू. १०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीस मान्यता देण्यात आली आहे.सबब, तांत्रिक मान्यता दिलेल्या प्रत्येक कामाच्या रक्कम रू. १०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीच्या प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात करण्यात यावी. एखाद्या कामाची तांत्रिक मान्यता कमी किंमतीची (रू. १० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे काम) असल्यास सदर कामे एकत्रित करून प्रशासकीय मान्यता (Package) प्रदान करण्यात यावी. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची (Package) ई-निविदा करणे अपेक्षित आहे. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची ई-निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम ई-निविदेने करणे बंधनकारक असून, प्रशासकीय मान्यतेच्या (Package) रकमेचे पुनश्च: विलगीकरण (Splitting) करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व:उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरुक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

६. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

७. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा

करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. प्रत्येक काम किमान रू.१० लक्ष किंमतीचे राहील याची दक्षता घेण्यात यावी.

८. जिल्हाधिकारी यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे."ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे. तसेच दर सहा महिन्यांनी जिल्ह्यांतर्गत या योजनेखाली हाती घेण्यात आलेल्या कामांचा आढावा घेणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे व निधी आहरीत करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे. अशी बाब असल्यास सदरचा निधी आहरीत करू नये.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर योजनेअंतर्गत करण्यात येणा-या रस्त्यांच्या कामांना इतर कोणत्याही योजनेमधून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही अथवा सदरची कामे करण्यात आलेली नाही याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(ग) सध्या सुरू असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे.प्रस्तावित रस्त्यांच्या ठीकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

९. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

१०. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

११. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर ही निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ करिता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

१२. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता जिल्हाधिकारी, बीड यांना नियंत्रक अधिकारी तसेच, जिल्हा प्रशासन अधिकारी,बीड यांना यापुढे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, बीड / जिल्हा प्रशासन अधिकारी,बीड यांनी सदरचा निधी कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

१३. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये "**नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान**" या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तीची पुर्तता झाल्याची व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात यावी.

१४. सदरचे अनुदान दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

१५. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ करिता वितरीत कलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

१६. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षण / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकाऱ्याने करावी व गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करुन नये.

**१७.** राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी तात्काळ संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/ कार्यान्वयन यंत्रणा यांना **कोणत्याही प्रकारची कपात न करता** वितरीत करण्यात यावा.

**१८.** या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ तसेच, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-११९८/प्र.क्र.३०/न.वि.-०४, दिनांक १२ मार्च,२०१८, दिनांक ४ जून, २०१८, दिनांक ९ ऑगस्ट,२०१८, दिनांक १५ डिसेंबर, २०१८, दि.०१ जून, २०१९,दि.२६ फेब्रुवारी,२०२०, दि.११ जुन,२०२०,दि.२१ मे,२०२१, दि.२८ मार्च,२०२२ व दि. २८ एप्रिल, २०२३ अन्वये कार्यवाही करावी.

**१९.** यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-५, मुख्य लेखाशिर्ष ४२१७, नगर विकासावरील भांडवली खर्च, ८०, सर्वसाधारण,१९२, नगरपरिषदांना सहाय्य, (००) (०८) नगर परिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान (कार्यक्रम), (४२१७ ०६०३), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर), या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

**२०.** सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. १२ एप्रिल, २०२३ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात तसेच सदर परिपत्रकातील अटी व शर्तींच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे.सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अ.क्र.९ मधील तपासणीसुचीतील अ.क्र.१ ते १० मधील लागू असलेल्या अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणीत करण्यात येत आहे.

**२१.** संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(श्रीकांत आंडगे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई
२. विभागीय आयुक्त, औरंगाबाद
३. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,बेलापूर भवन ७ वा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४.
४. जिल्हाधिकारी, बीड
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई

९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

१०. सहायक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,नवी मुंबई - ४०० ६१४

११. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

१२. जिल्हा प्रशासन अधिकारी, बीड

१३. मुख्याधिकारी, बीड / अंबाजोगाई / आष्टी / पाटोदा / शिरुर (का.) / वडवणी / माजलगांव / केज / धारुर /गेवराई / परळी नगरपरिषद / नगरपंचायत जि.बीड

१४. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई

१५. कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

## शासन निर्णय क्रमांक:- नपावै-२०२३/प्र.क्र.३२८(२८)/नवि-१६

## दिनांक:- ३१ जुलै, २०२३ सोबतचे विवरणपत्र

**(१) अंबाजोगाई नगरपरिषद जि. बीड क्षेत्रातील कामांची नावे**

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | प्रभाग ६ मध्ये गोपीनाथ मुंडे साहेब चौक ते गॅस एजन्सीपर्यंत सिमेंट | १०.०० |
| २ | प्रभाग ६ मध्ये सारस्वत कॉलनी काळे यांचे घर ते श्री पाठक यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ३ | प्रभाग १४ मध्य आज ते धायगुडे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| ४ | अंबाजोगाई शहरातील काशि विश्वनाथ मंदिर परिसरात लादीकरण करणे. | १०.०० |
| ५ | प्रभाग ४ मध्ये मुक्तेश्वर मंदिर परिसरात लादीकरण करणे. | १०.०० |
| ६ | प्रभाग १४ मध्ये सार्वजनिक ठिकाणी लादीकरण करणे. | १०.०० |
| ७ | अंबाजोगाई शहरातील खरात गित्ते घर ते महादेव मंदिरपर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ८ | वार्ड क ४ मध्ये पांचाळ यांचे घर ते श्री काळे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ९ | अंबाजोगाई येथे श्री श्री शंभूलिंग शिवाचार्य मठ येथे स्वच्छतागृह बांधकाम करणे | १०.०० |
| १० | अंबाजोगाई शहरातील सोनवणे कुशन ते भिसे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ११ | अंबाजोगाई शहरातील प्रभाग के ५ येथे सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १२ | प्रभाग ३ मध्ये लांडगे ते ठाकुर यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **१२०.००** |

**(२) परळी नगरपरिषद जि. बीड क्षेत्रातील कामे**

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्रमांक ५ मध्ये वैद्यनाथ शाळेजवळ हालगे यांचे किराणा दुकान ते चाटुफळे यांचे घरापर्यंत नाली बांधकाम करणे | १०.०० |
| २ | प्रभाग क्रमांक ५ मध्ये जोशी ते गोडाळे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | |
| ३ | प्रभाग क्रमांक ६ मध्ये सावतामाळी मंदिर परिसरात सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ४ | प्रभाग क्रमांक ६ मध्ये खंडोबा नगर येथे पाथरकर ते नालटे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | |

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| ५ | प्रभाग क्रमांक ६ मध्ये काका नगर येथे सिमेंट रस्ता व हायमास्ट पथदिवे बसवणे | १०.०० |
| ६ | प्रभाग क्रमांक ७ मध्ये दिनकर हिरवे यांचे घराजवळील चौकात हायमास्ट पथदिवे बसवणे | १०.०० |
| ७ | प्रभाग क्रमांक ६ मध्ये चिकणे ते शेळके यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| ८ | प्रभाग १६ मध्ये सार्वजनिक स्मशानभुमी येथे पेव्हर ब्लॉक करणे | |
| ९ | प्रभाग ८ मध्ये शारदा नगर येथे मुंडे यांचे दवाखान्याजवळ हायमास्ट बसवणे | १०.०० |
| १० | प्रभाग ८ मध्ये जलालपुर जिजामाता चौक येथे हायमास्ट बसवणे | |
| ११ | प्रभाग १६ मध्ये लिंगायत समाज स्मशानभुमी येथे पेव्हर ब्लॉक करणे | १५.०० |
| १२ | प्रभाग १६ मध्ये लिंगायत समाज स्मशानभुमी येथे निवारा शेड करणे | |
| १३ | प्रभाग १६ मध्ये प्रियानगर येथे पेट्रोल पंपाच्या बाजुने जाणाऱ्या कॉलनीत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १४ | प्रभाग १३ मध्ये विवेकानंदनगर येथे सराफा मार्केटमध्ये हायमास्ट पथदिवे करणे | १०.०० |
| १५ | प्रभाग १३ मध्ये ओपळे गल्लीत पांडुरंग सोनी ते बुरांडे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | |
| १६ | प्रभाग १६ मध्ये आयेशा कॉलनी येथे मुन्ना खतीब ते शादीखानापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १५.०० |
| १७ | प्रभाग १६ मध्ये आयेशा कॉलनी येथे मदरसा ते मोबीन गुत्तेदार यांचे पर्यंत सिमेंट रस्ता करणे | |
| १८ | प्रभाग १६ मध्ये आयेशा कॉलनी येथे रौफ चौक येथे हायमास्ट पथदिवे बसवणे | १०.०० |
| १९ | प्रभाग १६ मध्ये हनुमाननगर येथे पांढरीचा मळा मंदिर परिसरात हायमास्ट बसवणे | १०.०० |
| २० | प्रभाग १६ मध्ये हनुमाननगर येथे नागनाथ हालगे ते विठ्ठल शिवगण यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| २१ | प्रभाग १४ मध्ये सुर्वेश्वरनगर भागात सिमेंट रस्ता करणे | |
| २२ | प्रभाग १२ जिरगेनगर तहसील परिसरात सिमेंट रस्ता व हायमास्ट पथदिवा बसवणे | १०.०० |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **१५०.००** |

**(३) वडवणी नगरपंचायत जि. बीड क्षेत्रातील कामे**

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | वडवणी नगरपंचायत वार्ड क्रमांक ३ अंतर्गत सचिन सानप यांचे घर ते वाघजळीचा नाल्यापर्यंत पिवर ब्लॉक बसवणे | १०.०० |
| २ | वडवणी नगरपंचायत वार्ड क्रमांक ३ अंतर्गत सिमेंट रस्ता करणे करणे | |
| ३ | वार्ड क्रं २ चिंचोटी रोड ते आप्पा धाइतिडक यांचे घर सिमेंट रस्ता करणे करणे | १०.०० |
| ४ | वार्ड क्रं ६ रामराव आडे ते केशव राठोड यांचे घर सिमेंट रस्ता करणे करणे | |
| ५ | वार्ड क्रं ८ शेख रशीद ते सय्यद नशिर यांचे घर सिमेंट रस्ता करणे करणे | १०.०० |
| ३ | वार्ड क्रं १० रतन रामभाऊ उजगरे ते संदिपान शिंदे यांचे घर सिमेंट रस्ता करणे करणे | |
| ७ | वार्ड क्रं १२ सुधाकर तेटाबे यांचे घर ते तुकाराम वाव्हळ यांचे घर सिमेंट रस्ता करणे करणे | १०.०० |
| ८ | वार्ड क्रं १३ गणपती मंदिर ते भीमराव टकले लादीकरण करणे. | |
| ९ | वार्ड क्रं १५ बंगला चौक ते मधु जोशी यांचे घर लादीकरण करणे. | १०.०० |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **५०.००** |

**(४) पाटोदा नगरपंचायत जि. बीड क्षेत्रातील कामे**

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | प्रफुल्ल देशमुख यांचे घर ते वाघमारे यांचे घर सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे | १०.०० |
| २ | राजेश गीते यांचे घर ते सेवक सोंडगे यांचे घर सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे | |
| ३ | मुरलीधर कोल्हे यांचे घर ते राख यांचे घर सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे | १०.०० |
| ४ | महासांगवी रोड ते मुबारक सरपंच यांचे घर सिमेंट कॉक्रिट रस्ता करणे | |
| ५ | सुधाकर तांगडे यांचे घर ते पी. एस पवार साहेब यांचे घर सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे | २०.०० |
| ६ | रेणुका माता मंदिर ते पोलीस कॉलनी सिमेंट कॉक्रेट रस्ता करणे | |
| ७ | प्रभाग क्रमांक १७ मधील मंदिर परिसरामधील लादीकरण करणे. | |
| ८ | गांधनवाडी गनवाडी येथे "विठ्ठल-रुखमिनी मंदिर परिसरात वॉल कंपाउंड करणे | |

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| ९ | पाटोदा नगरपंचायत अंतरगत गांधनवाडी येथे "सिमेंट रस्ता बांधकाम करणे | १०.०० |
| १० | प्रभाग क्र. १७ मधील नाली व लादीकरण करणे. | |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **५०.००** |

**(५) आष्टी नगरपंचायत जि. बीड क्षेत्रातील कामे**

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | आष्टी ता. आष्टी जि. बीड येथील सरकारी दवाखाना रोड पुलाजवळील रस्ता ते दिगांबर ढेगे याच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता तयार करणे | १०.०० |
| २ | आष्टी ता. आष्टी जि. बीड येथील शशीकांत निकाळजे याच्या घरापासून ते महादेव मस्के याच्या घरा पर्यंत सिमेंट रस्ता करणे. | |
| ३ | आष्टी ता. आष्टी जि. बीड येथील उमर नगर मार्केट यार आष्टी येथे सिमेंट रस्ता करणे. | १०.०० |
| ४ | आष्टी ता. आष्टी जि. बीड हंबर्डे गल्ली ते वर्धमाने यांचे निवासस्थान पर्यंत सिमेंट रस्ता करणे. | |
| ५ | आष्टी ता. आष्टी जि. बीड येथील हंबर्डे गल्ली ते कुंभार गल्ली अंडरग्राऊंड नालीवर सिमेंट कॉंक्रीट करणे | १०.०० |
| ६ | प्रभाग ८ मध्ये आनंद भवन च्या उत्तरेस सीमेंट रास्ता करणे | |
| ७ | प्रभाग ४ मध्ये सीमेंट रास्ता करणे | १०.०० |
| ८ | प्रभाग ४ मध्ये साकड गल्ली व परिसरात हायमास्ट बसवणे | |
| ९ | प्रभाग ९ मध्ये अभ्यासिका बांधकाम करणे | १०.०० |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **५०.००** |

**(६) बीड नगरपरिषद नगरपंचायत जि. बीड क्षेत्रातील कामे**

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | प्रभाग २ मध्ये माळीवेस बौध्द विहार कॉर्नर ते भास्कर विद्यागर यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| २ | प्रभाग १८ शास्त्रीनगरमध्ये ऐश्वर्या बियर बार ते नवले शाळेपर्यंत सिमेंट सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ३ | प्रभाग ११ आदित्यनगरी मध्ये बालाजी पवार ते श्री श्री रविशंकर इंग्लीश स्कुल सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| ४ | प्रभाग २२ शिराळेनगर मध्ये नवनाथ शिराळे ते सोनवणे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ५ | प्रभाग ४ वत्तारवेस मध्ये जितेंद्र सौदा ते राकेश झिंझोट यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| ६ | प्रभाग १४ अभियंतानगर बापुराव डोके ते पंचमुखी हनुमान मंदिर पर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ७ | प्रभाग २० गजानननगर कॉर्नर ते जमाल बागवान यांचे घर नाशिर रिक्षावाला मार्गे मुनीर किराणा दुकानापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ८ | प्रभाग २३ नुतन कॉलनी मध्ये रवि वाघमारे ते शांतीनाथ डोरले यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ९ | प्रभाग ०२ सहयोगनरमध्ये गित्ते ससाणे ते दत्ता शिंदे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १० | प्रभाग ०७ छापखाना गल्ली गणपती मंदिर ते लक्ष्मीदेवी मंदिर सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ११ | प्रभाग १२ बालेपीर भारतभूषणनगर मध्ये नगर रोड ते गायकवाड यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १२ | प्रभाग १४ संभाजीनगर मध्ये पालवण रोड ते दिलीप पवार यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १३ | प्रभाग १५ चाणक्यपुरी मध्ये हनुमान मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक करणे बीड | १०.०० |
| १४ | प्रभाग ०५ मोची गल्लीमध्ये पवार बिल्डिंग ते अर्जुन वडतिले यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १५ | प्रभाग १३ गोविंदनगर, विवेकानंद शाळा ते वाव्हळ यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १६ | प्रभाग १७ धांडे गल्ली, हर्षद शेख ते मुळूक यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १७ | प्रभाग ०३ शुक्रवार पेठ बीड मंत्री कन्ट्रक्शन मध्ये तळेकर यांचे घर ते भोसले यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १८ | प्रभाग ११ मुख्य रस्ता ते समर्थनगर बीड सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १९ | बीड शहर अंतर्गत हॉटेल शिल्पा ते भगवान हॉस्पिटल नाली दुरुस्ती करणे | १०.०० |
| २० | प्रभाग ०३ हनुमाननगर एमआयडीसी येथे सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **२००.००** |

**(७) केज नगरपंचायत जि. बीड क्षेत्रातील कामांची नावे**

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | प्रभाग ८ मध्ये कळंब रोड ते कलिम इनामदार यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| २ | प्रभाग ८ मध्ये मुशीर इनामदार ते अहमदभाई यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ३ | प्रभाग ७ मध्ये पौळ यांचे घर ते ज्ञानप्रबोधिनी शाळेपर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| ४ | प्रभाग ६ मध्ये बीड रोड ते संगीता साळवे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| ५ | प्रभाग १७ मध्ये अलि इनामदार यांचे घर ते खुबा मस्जिदकडे जाणारा रस्ता लादीकरण व नाली बांधकाम करणे. | १०.०० |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **५०.००** |

**(८) माजलगांव नगरपरिषद जि. बीड क्षेत्रातील कामांची नावे**

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | वार्ड क १ मध्ये विवेकानंदनगर मध्ये मोरे नाना ते मोहन काका सोळंके यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| २ | वार्ड १० मध्ये झेंडा चौक पाटील गल्ली ते संतोष रोडे किराणा ते अभय देशमुख यांचे घर सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ३ | वार्ड २ मध्ये अशोकनगर येथे आकाश रणनागत ते बापु उजगरे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ४ | प्रभाग १ मध्ये महात्मा फुले शाळेमागे रशिद खान यांचे घर ते गवते व सावंत सर यांच्या बाजुची नालीची उंची वाढवणे व पेव्हर ब्लॉक करणे | १०.०० |
| ५ | प्रभाग १ मध्ये श्री भिल्लारे ते देशमुख डिपीपर्यंत नालीची उंची वाढवणे. | १०.०० |
| ६ | प्रभाग ९ मध्ये रमेश चौकीदार यांचे घर ते दत्त मंदिरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | |
| ७ | प्रभाग १० मध्ये शंकर देवा जोशी यांचे घरापासुन ते सिध्देश्वर मंदिरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ८ | प्रभाग ३ मध्ये शंकरराव सुरवसे यांचे घरापासुन ते मारुती मंदिरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ९ | प्रभाग १० मध्ये चाउस किराणा ते उमेश जाधव यांचे घर ते शिवाजी तावडकर यांचे घर ते बाळासाहेब जाधव यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| १० | प्रभाग १ मध्ये विवेकानंदनगर येथे साडेगावकर ते गायके यांचे घरासमोरील सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| ११ | प्रभाग १ मध्ये बँक कॉलनी येथे राहुल कुलकर्णी ते मंजरत रोड जयभवानी चौकापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |

३१/०७/२३

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १२ | प्रभाग ८ मध्ये जुना कोर्टासमोरील सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| १३ | प्रभाग १ मध्ये विवेकानंदनगर येथे अनंतराव भोले यांचे घर ते सुनिल हाके यांचे घरासमोरील सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १४ | प्रभाग ६ मध्ये माजलगाव अंतर्गत फुलेनगर बाशिंबे यांचे घर ते पतंगे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १५ | प्रभाग ६ मध्ये फुलेनगर अंतर्गत वशिष्ट शिंदे यांचे घर ते शरणागत यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **१४०.००** |

**(९) शिरुर (का.) नगरपंचायत जि. बीड क्षेत्रातील कामांची नावे**

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | प्रभाग १७ नगरपंचायत शिरुर कासार येथे गोपीनाथ मुंडे नगर येथील अण्णासाहेब ढाकणे यांचे घर ते संजय जायभाये यांचे घरापर्यंत सेंसर | १०.०० |
| २ | वार्ड क १७ मध्ये डॉ बडे यांचे घरापासुन सेंसर स्ट्रीट लाईट बसवणे | १०.०० |
| ३ | प्रभाग ६ मध्ये केंद्रीय कन्या शाळेसमोर प्रांगणात लादीकरण करणे. | |
| ४ | प्रभाग १ मध्ये हरीदास वस्ती येथे खडीकरण करणे | १०.०० |
| ५ | प्रभाग ७ मध्ये पेव्हर ब्लॉक करणे | |
| ६ | प्रभाग १३ मध्ये विठ्ठलनगर येथे आरक्षित जागेवर सुशोभिकरण करणे | १०.०० |
| ७ | प्रभाग ६ मध्ये पशुवैद्यकीय दवाखाना समोर लादीकरण करणे. | |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **४०.००** |

**(१०) धारुर नगरपरिषद जि. बीड क्षेत्रातील कामांची नावे**

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | कटघरपूरा बालाजी मंदिर सभामंडप बांधकाम करणे | १०.०० |
| २ | कटघरपूरा बालाजी मंदिर परिसरात लादीकरण व सीसी रस्ता करणे | |
| ३ | पारेकर गल्ली परिसरात लादीकरण करणे. | १०.०० |
| ४ | पेठ धनगरवाडा येथे लादीकरण करणे. | |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **२०.००** |

**(११) गेवराई नगरपरिषद जि. बीड क्षेत्रातील कामांची नावे**

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | वार्ड क्रमांक ५ नॅशनल हायवे २११ हॉटेल निसर्ग ते पाटील नगर सिमेंट रस्ता करणे भाग १ | १०.०० |
| २ | वार्ड क्रमांक ५ नॅशनल हायवे २११ हॉटेल निसर्ग ते पाटील नगर सिमेंट रस्ता करणे- भाग २ | १०.०० |
| ३ | वार्ड क्रमांक ५ नॅशनल हायवे २११ प्रसाद जिनिंगच्या समोर उर्दू शाळेकडे जाणारा रस्ता सिमेंट रस्ता करणे भाग १ | १०.०० |
| ४ | वार्ड क्रमांक इनॅशनल हायवे २११ प्रसाद जिनिंगच्या समोर उर्दू शाळेकडे जाणारा रस्ता सिमेंट रस्ता करणे- भाग २ | १०.०० |
| ५ | वार्ड क्रमांक २ छत्रपती नगर गेवराई. एडवोकेट एच एस पाटील यांच्या घराकडे जाणारा रस्ता सिमेंट कॉंक्रेट करणे. | १०.०० |
| ६ | नॅशनल हायवे २११ वार्ड क्रं ५ मध्ये पाटील नगर येथे नाली बांधकाम करणे | १०.०० |
| ७ | नरहरी मंदिरामध्ये सोनार समाज सभा मंडप करणे | १०.०० |
| ८ | स्वामी समर्थ मंदिर गेवराई येथे सभा मंडप करणे | १०.०० |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **८०.००** |
| | **१ ते ११ एकुण रक्कम रु.** | |